सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २८३ | रविवार, दि. ५ जुलै २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१
**सोने-चांदी**
**आजचे भाव**
२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १४५६००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १३३६००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ १०९६००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २३८०/-
भाव प्रती १० ग्रॅम

आजचे
**अभीष्टचिंतन**



श्री. तुषार भारंबे
जळगाव

## दिनविशेष
५ जुलै

- बालगंधर्वांनी गंधर्व नाटक मंडळीची स्थापना केली.
- बीबीसीने पहिले टेलिव्हिजन न्यूज बुलेटिन प्रसारित केले.
- जागतिक आरोग्य संघटनेने,भारतातून देवी रोगाचे निर्मूलन घोषित केले.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!

# अमळनेरमध्ये भल्या पहाटे 'एलसीबी'चा छापा; बेकायदेशीर गोवंश कत्तलीवर मोठी कारवाई

## दोन ठिकाणी एकाच वेळी छापे; ११ जण ताब्यात, ६ फरार; मुद्देमाल जप्त

**ग्लोबल महातेज वत्तसेवा**

अमळनेर : जळगावच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने आज शनिवार, दि. ४ जुलै रोजी पहाटे नियोजनबद्ध धडक कारवाई करत बेकायदेशीर गोवंश कत्तलीच्या दोन ठिकाणांवर छापे टाकून मोठी कारवाई केली. पारधीवाडा आणि जपान जीन परिसरात एकाचवेळी टाकलेल्या छाप्यांमध्ये ११ जणांना ताब्यात घेण्यात आले असून, ६ संशयित घटनास्थळावरून पसार झाले आहेत.

या कारवाईत मोठ्या प्रमाणात गोवंशाचे मांस, कत्तलीसाठी वापरली जाणारी हत्यारे व साहित्य जप्त करण्यात आले, तर तीन जीवंत बैलांची सुटका करून त्यांना सुरक्षित गोशाळेत हलविण्यात आले. सकाळी ६ ते दुपारी १२ या कालावधीत राबविण्यात आलेल्या विशेष मोहिमेत पोलिसांनी पारधीवाडा व जपान जीन परिसरातील दोन ठिकाणांवर एकाच वेळी छापे टाकले. कारवाईदरम्यान घटनास्थळावरून हसनखान गुलाबखान पठाण (वय ६५), मोहसीनखान हसनखान पठाण (वय ३५), फराजखान हमीदखान कुरेशी (वय २०), अर्षदखान अजीजखान कुरेशी (वय ४८), रियाज अहमद अब्दुल शकुर कुरेशी (वय ५५), तन्वीर शेख ताहेर कुरेशी (वय ४१), जावेदखान सुलेमानखान कुरेशी (वय ५०), अब्दुल शेख नुरा कुरेशी (वय ५०), अजीज शेख नजीर कुरेशी, अल्ताफखान अजीजखान कुरेशी (वय ५६) आणि शरीफ शेख अकबर कुरेशी (वय २५) यांना ताब्यात घेण्यात आले.

दरम्यान, इकबाल शेख आहत शेख कुरेशी, जहांगीर शेख साबीर शेख कुरेशी, आरीफ अजीज कुरेशी, जाबीर खान अब्बासखान कुरेशी, जहीरखान जाबीरखान कुरेशी आणि शरीफ खान मजीदखान कुरेशी हे सहा संशयित घटनास्थळावरून पसार झाले असून, त्यांचा शोध सुरू आहे.

कारवाईदरम्यान विविध वयोगटातील गोवंशाचे सुमारे १,५७५ किलो मांस (अंदाजे किंमत तीन लाख १५ हजार रुपये) जप्त करण्यात आले. तसेच चार लोखंडी कुऱ्हाडी, नऊ लोखंडी सुऱ्या, सहा कोयते, दोन वजनकाटे व इतर साहित्य असा एकूण तीन लाख १८ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.



*अमळनेर : जळगावच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) मदतीने आज शनिवार, दि. ४ जुलै रोजी पहाटे पारधीवाडा व जपान जीन परिसरात नियोजनबद्ध धडक कारवाई करत बेकायदेशीर गोवंश कत्तलीच्या दोन ठिकाणांवर छापे टाकून पकडलेल्या आरोपींसमवेत पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम व त्यांचे अन्य सहकारी.*

याशिवाय जपान जीन परिसरातील पत्र्याच्या शेडमधून १२ ते १६ वर्षे वयोगटातील तीन पांढऱ्या गावरान बैलांची सुटका करण्यात आली. या जनावरांची अंदाजित किंमत एक लाख ५५ हजार रुपये असून त्यांना सुरक्षित गोशाळेत हलविण्यात आले. जप्त मुद्देमाल व जनावरांची एकूण किंमत चार लाख ७३ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

कारवाईनंतर पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. संदेश वाठोरे यांच्या उपस्थितीत गोवंशाच्या मांसाचे रासायनिक विश्लेषणासाठी (सी.ए.) नमुने सीलबंद करण्यात आले. उर्वरित मांस अमळनेर पालिकेच्या मदतीने पंचांसमक्ष खड्डा खोदून नष्ट करण्यात आले. या प्रकरणी संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी विशेष पथके रवाना केली आहेत.

# मंदिर पुनर्बांधणीसह 'ब' वर्ग तीर्थक्षेत्रासाठी मदत करू

## पालकमंत्री : आगीच्या स्थळाची पाहणी करून विश्वस्त, प्रशासनाकडून घेतली माहिती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील संत श्री सखाराम महाराज वाडी संस्थान हे अमळनेरचेच ग्रामदैवत नव्हे, तर खानदेशासह राज्यभरातील लाखो भाविकांच्या श्रद्धा आणि विश्वासाचे स्थान आहे. या पवित्र स्थळी लागलेली भीषण आग अत्यंत वेदनादायी आणि दुर्दैवीच म्हणावी लागेल. त्यामुळे या मंदिराच्या पुनर्बांधणीसाठी शासनाकडून सर्वतोपरी मदत उपलब्ध करून देण्यासह या संस्थानाला 'ब' वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळावा, यासाठीही शासन स्तरावर आवश्यक प्रस्ताव सादर करून मंजुरीसाठी सातत्याने पाठपुरावा केला जाईल. तसेच शासन या संकटात संस्थानाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहील, अशी ग्वाही राज्याचे पाणीपुरवठा तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांनी दिली.



*अमळनेर : संत श्री सखाराम महाराज वाडी संस्थानातील मुख्य इमारतीला लागलेल्या भीषण आगीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीची शुक्रवार, दि. ३ जुलै रोजी दुपारी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करताना पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील. शेजारी नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, विश्वस्त तसेच प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी.*

येथील ग्रामदैवत आणि लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या संत श्री सखाराम महाराज वाडी संस्थानातील मुख्य इमारतीला लागलेल्या भीषण आगीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या नुकसानीची त्यांनी शुक्रवार, दि. ३ जुलै रोजी दुपारी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. तसेच मंदिर परिसराची सविस्तर पाहणी करून त्यांनी नुकसानीचा आढावा घेऊन संस्थानाच्या विश्वस्तांसह प्रशासनातील अधिकाऱ्यांशी चर्चा

**पान २ वर**

# शनिशिंगणापूरच्या भाविकांसाठी आनंदाची बातमी!

## वर्षभरापासून बंद श्री शनेश्वर देवस्थान ट्रस्टचे प्रसाद भोजनालय पुन्हा सुरू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गेल्या एक वर्षापासून बंद असलेले श्री शनेश्वर देवस्थान ट्रस्टचे प्रसाद भोजनालय अखेर १ जुलै २०२६ पासून पुन्हा सुरू झाले आहे. त्यामुळे देशभरातून दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांना आता पुन्हा एकदा माफक दरात प्रसाद भोजनाचा लाभ घेता येणार आहे.


**पान २ वर**

# घरबसल्या आधार कार्ड बनविण्यासाठी UIDAI ची 'होम सर्व्हिस'; किती शुल्क मोजावे लागणार?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**







आता ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्तींना आधार कार्ड बनविण्यासाठी किंवा अपडेट करण्यासाठी आधार केंद्रावर जाण्याची गरज भासणार नाही. UIDAI ने अशा गरजू नागरिकांसाठी 'होम एनरोलमेंट सर्व्हिस' सुरू केली आहे. या विशेष सुविधेंतर्गत अधिकृत ऑपरेटर थेट संबंधित व्यक्तीच्या घरी जाऊन बायोमेट्रिक आणि इतर आवश्यक कागदपत्रांची प्रक्रिया पूर्ण करेल. चला तर मग जाणून घेऊया.

घरी बोलावून आधार कार्ड बनवून घेण्यासाठी युजर्सना नियमित शासकीय शुल्काव्यतिरिक्त ७०० रुपये अतिरिक्त सेवा शुल्क द्यावे लागणार आहे. ही योजना प्रामुख्याने शारीरिकदृष्ट्या असमर्थ, गंभीर आजारी आणि वयोवृद्ध लोकांसाठी अत्यंत फायदेशीर ठरणार आहे. या सरकारी सेवेचा लाभ घेण्यासाठी नागरिकांना ऑनलाईन पद्धतीने अपॉइंटमेंट बुक करावी लागेल.

या सेवेसाठी आकारले जाणारे शुल्कही खूप जास्त आहे. तथापि, जर तुम्हाला एखाद्या गरजू व्यक्तीसाठी आधार कार्ड मिळवायचे असेल तर ऑपरेटरला घरी कॉल करून तुम्ही १९४७ वर सेवेसाठी विनंती बुक करू शकता.

### UIDAI ची होम एनरोलमेंट सेवा काय आहे?

UIDAI ची होम एनरोलमेंट सर्व्हिस ही गरजू लोकांसाठी सुरू केलेली एक विशेष सेवा आहे. या अंतर्गत अटी पूर्ण करणारे नागरिक घरबसल्या आधार बनवू शकतात किंवा त्यात कोणत्याही प्रकारचे बदल करून घेऊ शकतात. या सेवेमध्ये लोकांना हवे असल्यास ते घरी बसून बायोमेट्रिक डेटा अपडेट करू शकतात.

### सेवा कोण घेऊ शकेल?

आधार केंद्रावर जाऊ न शकणाऱ्यांसाठीच ही सेवा सुरू करण्यात आली आहे. ही सेवा केवळ ज्येष्ठ नागरिक लोकांनाच मिळू शकते. जे रुग्ण अंथरुणातून बाहेर पडू शकत नाहीत आणि अत्यंत असुरक्षित लोक जे आधार केंद्रावर जाऊ शकत नाहीत. याशिवाय जे अपंग लोक या सेवेचा लाभ घेऊ शकतात, जे आधार केंद्रावर जाऊ शकत नाहीत.

### किंमत किती असेल?

ही सेवा गरजू लोकांसाठी सुरू करण्यात आली आहे. परंतु तिचे शुल्क वेगळे आहे. जर एकाच रहिवाशासाठी त्याच पत्त्यावर सेवा बुक केली असेल तर सेवा शुल्क ७०० रुपये निश्चित केले जाते. जर त्या पत्त्यावरील मुख्य रहिवासी तसेच इतर कोणत्याही सदस्याला या सेवेचा लाभ घ्यायचा असेल तर प्रत्येक सदस्याला स्वतंत्रपणे ३५० रुपये द्यावे लागतील. हे लक्षात घेण्यासारखे आहे की हे शुल्क सामान्य सरकारी अपडेट फी व्यतिरिक्त आकारले जाईल जे ५० ते १०० रुपयांपर्यंत आहे.

### सेवा कशी बुक करावी?

ही सेवा बुक करण्यासाठी आपण १९४७ या क्रमांकावर कॉल करू शकता किंवा आपण UIDAI च्या प्रादेशिक कार्यालयात ई-मेलद्वारे आवश्यक कागदपत्रांसह विनंती पाठवू शकता. प्रादेशिक कार्यालयातून मान्यता मिळाल्यानंतर हे काम संबंधित निबंधक किंवा आधार केंद्राकडे सोपविले जाते, जे ७ ते १५ दिवसांत ऑपरेटरला आपल्या घरी पाठवून बायोमेट्रिक आणि इतर प्रक्रिया पूर्ण करतात.

# वाडी संस्थानाच्या आगीत हिंदू-मुस्लिम ऐक्याचे दर्शन

## 'तुमच्या एकोप्यामुळे माझी वारी निर्धास्तपणे सुरू' : प. पू. प्रसाद महाराज

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



> *वाडी संस्थानाला आग लागल्याचे कळताच अमळनेरकरांनी दाखविलेला एकोपा माझ्यासाठी मोठा आधार आहे. हिंदू-मुस्लिम बांधवांनी हातात हात घालून जीवाची पर्वा न करता मंदिर वाचविण्यासाठी प्रयत्न केले. प्रशासन, अग्नीशमन दल, पोलीस, पत्रकार, लोकप्रतिनिधी, वाडी संस्थानाचे सर्व पदाधिकारी, विश्वस्त मंडळ, भक्तगण, विविध संस्थांचे सर्व सेवेकरी आणि मदतीला धावून आलेल्या प्रत्येक नागरिकाला माझा आशीर्वाद आहे. तुम्ही सर्व माझ्यासोबत आहात. त्यामुळे मला कसलीही चिंता नाही. 'आधी पांडुरंग' या भावनेने माझी वारी सुरूच राहील. मंदिराची पुनर्बांधणीही आपल्या सर्वांच्या एकोप्याने नक्की उभी राहील.*
>
> – **प. पू. प्रसाद महाराज**, *गादीपुरुष, संत श्री सखाराम महाराज वाडी संस्थान, अमळनेर*

अमळनेर : येथील संपूर्ण महाराष्ट्रात 'प्रति पंढरपूर' म्हणून प्रसिद्ध असलेल्या संत श्री सखाराम महाराज वाडी संस्थानात बुधवार, दि. १ जुलै रोजी रात्री साडेआठच्या सुमारास शॉर्टसर्किटमुळे भीषण आग लागली. या दुर्घटनेत सभामंडपाचे मोठे नुकसान झाले. मात्र, या संकटाच्या क्षणी धर्म, जात आणि राजकीय भेद विसरून हिंदू-मुस्लिम बांधवांनी एकत्र येत जीवाची पर्वा न करता आग विझविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांमुळे सामाजिक ऐक्याचे प्रेरणादायी दर्शन घडल्याची भावना प. पू. प्रसाद महाराज यांनी व्यक्त केली आहे.

सध्या आषाढी वारीत असलेल्या प. पू. प्रसाद महाराजांनी भावनिक संदेशातून अमळनेरकरांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. आग लागल्याची माहिती मिळाल्यानंतर प्रशासन, प्रशासकीय अधिकारी, अग्नीशमन दल, पोलीस अधिकारी, होमगार्ड, नगरपालिकांचे अधिकारी, नगरसेवक, लोकप्रतिनिधी, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, वाडी संस्थानाचे सर्व पदाधिकारी, विश्वस्त मंडळ, भक्तगण, संस्थांचे सर्व सेवेकरी, तसेच हजारो नागरिकांनी तातडीने धाव घेत मदतकार्य केले. अमळनेरसह पारोळा, चोपडा, शिरपूर येथील अग्नीशमन दल आणि खासगी वाहनधारकांनीही शर्थीचे प्रयत्न केल्याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले.

मंदिराच्या पुनर्बांधणीसाठी शासनाकडे पाठपुरावा करणाऱ्या सर्व राजकीय नेत्यांचेही महाराजांनी कौतुक केले. याप्रसंगी दाखविलेला एकोपा भविष्यातही कायम ठेवावा आणि कोणत्याही संकटाला सर्वांनी मिळून सामोरे जावे, असे आवाहन त्यांनी केले.

दरम्यान, भीषण आगीत सभामंडपाचे मोठे नुकसान झाले असले, तरी गाभाऱ्यातील सर्व देवमूर्ती सुरक्षित राहिल्याने भाविकांनी याला ईश्वरी कृपा मानली आहे. 'बरेच काही जळाले, पण देव शाबूत राहिले; यापेक्षा मोठी कृपा कोणती?' अशी भावना अनेकांनी व्यक्त केली. आगीत मंदिराचे नुकसान झाले तरी प. पू. प्रसाद महाराजांनी आषाढी वारी अर्धवट सोडली नाही. 'आधी पांडुरंग' ही भूमिका कायम ठेवत त्यांनी दिंडीचा प्रवास सुरूच ठेवला. यापूर्वी स्वतःच्या मातोश्रींच्या निधनाच्या प्रसंगीही वारी सोडून ते परतले नव्हते. पांडुरंगाच्या भक्तीपुढे दुःख, मोह-माया आणि वैयक्तिक वेदना लहान ठरतात, अशी संतपरंपरेची शिकवण त्यांनी आपल्या कृतीतून पुन्हा अधोरेखित केली.

## संपादकीय

### बाई!

१९५० ते १९७५ हा २५ वर्षांचा कालखंड आणि त्या कालखंडाने दिलेल्या दीपस्तंभांच्या उजेडाने प्रकाशलेली पुढील पाच–दहा वर्षे हा मराठी सांस्कृतिक क्षेत्राचा 'रेनेसाँ' म्हणता येईल. 'रेनेसाँ' म्हणजे एक प्रकारे सांस्कृतिक, सामाजिक, वैचारिक घुसळण होऊन त्यातून नवनिर्मिती होणे, नवा विचार आकाराला येणे आणि तो स्वीकारला जाणे. नाटक, सिनेमा, साहित्य, संगीत, चित्रकला या सर्वच क्षेत्रांत त्या काळात ते झाले. सगळा विचारच बदलून टाकण्याचे सामर्थ्य असलेली जी उत्तुंग व्यक्तिमत्त्वे त्यातून आकाराला आली, त्यात नाट्यक्षेत्रात विजया मेहता यांच्या तोडीचे नाव क्वचितच एखादे असू शकेल किंवा नसेलही. 'रंगायन'च्या 'शितू', 'मादी', 'एक शून्य बाजीराव' या आणि अन्य नाटकांमधून त्यांनी ही प्रयोगशील नाटकांची चळवळ सुरू केली आणि 'रंगायन' बंद पडल्यावर पुढे व्यावसायिक रंगभूमीवर 'हमीदाबाईची कोठी', 'बॅरिस्टर' ही नाटके दिग्दर्शित करताना प्रायोगिकतेची व्याप्ती वाढवून व्यावसायिक नाटकांनाही त्यांनी नवी उंची बहाल करून दिली. एखाद्या लेखकालाच त्याचे नाटक नव्याने 'दाखवण्याची' दिग्दर्शकीय दृष्टी विजयाबाईंकडे होती. नाटकातील व्यक्तिरेखांचे, आशयाचे एक तात्पुरते स्वतंत्र असे जग रंगमंचावर निर्माण करण्याची कुवत त्यांच्यात होती. विजयाबाईंनी केलेले 'रावसाहेब', 'पेस्तनजी' हे चित्रपट आणि 'लाइफलाइन' सारखी मालिका हे सारे उत्तमच होते; परंतु 'उत्तम'च्याही पुढे जाऊन त्या कलाकृतीला दिग्दर्शनातून, अभिनयातून अभिजाततेचा एक स्पर्श देण्याची त्यांची जी किमया होती तिचा प्रत्यय मात्र रंगभूमीवरच खऱ्या अर्थाने आला होता. इब्राहिम अल्काझी यांना देशपातळीवर जे स्थान होते, पं. सत्यदेव दुबे यांना हिंदी रंगभूमीवर जे स्थान होते, तेच मराठी रंगभूमीच्या संदर्भात विजयाबाईंना होते.

रंगभूमीच्या संदर्भात प्रायोगिकता ही केवळ एक साहित्यिक संकल्पना नसते तर नाट्यप्रयोगातील रचनेचाही त्यात विचार असतो. नेपथ्य, प्रकाश, रंगभूषा, वेशभूषा, पात्ररचना, आवाजाचा वापर, अभिनयशैली अशा प्रत्येक अंगाबाबत वेगळा विचार होऊ शकतो, याचे भान विजयाबाईंनी आणि त्यांनी सुरू केलेल्या चळवळीने रंगभूमीला दिले. 'रंगायन' बंद पडल्यानंतर बाईंनी व्यावसायिक रंगभूमीवर पदार्पण केले; परंतु, या रंगभूमीला 'व्यावसायिक' न म्हणता 'लोकमान्य' रंगभूमी म्हणायचं ठरवले, हासुद्धा एक वेगळा विचार. हा विचार आपल्या सोबतचे कलावंत, लेखक, तंत्रज्ञ यांच्यात खोलवर रुजविण्याची त्यांची वृत्ती होती. त्यामुळे त्यांच्यासोबत काम केलेल्या कलावंतांच्या एकूणच कलादृष्टीत फरक पडत असे, त्यांची समज प्रगल्भ होत असे. 'बॅरिस्टर' या नाटकावरच विजयाबाईंनी 'रावसाहेब' हा चित्रपटही केला. एकाच आशयाकडे दोन वेगवेगळ्या माध्यमांमधून पाहताना दृष्टी कशी बदलते त्याचे उदाहरण इथे दिसते. 'बॅरिस्टर' खुर्चीवर बसून डोलतोय, राधाक्का आकांताने हातातल्या बांगड्या फोडते आणि मावशी हे विषण्णपणे पाहतेय आणि पडदा पडतो. 'रावसाहेब'मध्ये राधाक्काचा मुलगा सूर्यप्रकाशात येतो. राधाक्का खिडकीतून मुलाकडे पाहत असते. मुलगा मोठा होऊन परिस्थितीत बदल घडेल हा आशेचा किरण त्यातून दिसतो. आशयात असा बदल करण्याचे धाडस दिग्दर्शकात येते तो आशयाशी तादात्म्य पावल्यामुळेच.

प्रायोगिकता म्हणजे बंडखोरी नव्हे. परंपरा नीट समजून घेऊन त्यात बदल करण्याचा एक तात्त्विक विचार म्हणजे प्रायोगिकता. हा विचार वर्तमानाच्या आकलनातून, मानवी मूल्यांचा विचार करून आलेला नसेल तर तो उथळ ठरतो. विजयाबाई, दामू केंकरे, तेंडुलकर, अरविंद देशपांडे, सुलभा देशपांडे, दळवी, एलकुंचवार, नाना पाटेकर अशी त्या काळातील सर्व प्रतिभावंत मंडळी या एकाच समान धाग्याने गुंफलेली होती, म्हणूनच त्या काळावर ठसा उमटवून पन्नास वर्षे उलटल्यावरही तो टिकवू शकली. केवळ वेगळा नव्हे, तर नवा विचार घेऊन कोणतेही काम करण्याच्या त्यांच्या वृत्तीमुळेच त्यांची 'एनसीपीए'मधील कारकीर्दही लक्षात राहणारी ठरली. मराठी रंगभूमी ला नवतेचे भान देताना, आशय–मांडणीचे प्रयोग करतानाच्या प्रक्रियेत त्यांनी अनेकांना घडवले, त्यामुळेच त्यांना प्रेमाने 'बाई' हे संबोधन लागले. रंगभूमीच्या क्षेत्रातील शिक्षिका म्हणून विजयाबाईंनी तयार केलेल्या अनेक शिष्यांनी आजवर मराठी रंगभूमी संपन्न, समृद्ध केली आहे, पुढेही करत राहतील, हे निश्चित!

# संत श्री सखाराम महाराजांच्या वारीत ५४ हजार बियाण्यांचे रोपण

## रोटरी क्लब व महिला हाऊसिंग ट्रस्टने राबविला अभिनव उपक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील संत श्री सखाराम महाराज यांच्या पायी वारीच्या पवित्र सोहळ्यात यंदा पर्यावरण संवर्धनाचा अनोखा संदेश देत तब्बल ५४ हजार बियाण्यांचे रोपण व सीडबॉल निर्मिती अभियानास प्रारंभ करण्यात आला. या उपक्रमाद्वारे अध्यात्म आणि पर्यावरण यांचा सुंदर संगम साधण्यात आला. यापैकी ३६ हजार बियाणे संत श्री सखाराम महाराजांच्या चरणी अर्पण करण्यात आले, तर १८ हजार बियाण्यांचे वाटप अमळनेर तालुक्यातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांना करण्यात आले.

वारीचे प्रमुख ह. भ. प. देव महाराज गुरव यांच्याकडे या बियाण्यांचे संवर्धन व रोपण करण्याची सेवा सोपविण्यात आली. वारी मार्गावरील रस्त्यांच्या कडेला, मोकळ्या जागांमध्ये तसेच पंढरपूरपर्यंतच्या विविध वनक्षेत्रांमध्ये ही बियाणे पेरण्यात येणार असून, भविष्यात हजारो वृक्ष निर्माण करण्याचा संकल्प यामागे आहे. या उपक्रमाची संकल्पना प्रोजेक्ट चेअरमन रो. आशिष चौधरी यांची असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी सीडबॉल अभियान राबविण्यात येते. पर्यावरण संवर्धनासाठी जनसहभाग वाढावा, विद्यार्थ्यांमध्ये वृक्षप्रेम निर्माण व्हावे आणि भविष्यात हरित परिसर घडावा, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

रोटरी क्लब, अमळनेर आणि महिला हाऊसिंग ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमात महिला हाऊसिंग ट्रस्टच्या विविध विभागांतील महिलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. त्यांनी विविध शाळांमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना सीडबॉलचे महत्त्व, वृक्षसंवर्धनाची गरज आणि पर्यावरण रक्षणाची जबाबदारी याबाबत मार्गदर्शन केले.



*अमळनेर : रोटरी क्लब आणि महिला हाऊसिंग ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या पर्यावरण संवर्धन उपक्रमांतर्गत रोपणासाठीचे बियाणे वितरीत करताना प्रोजेक्ट चेअरमन रो. आशिष चौधरी. शेजारी महिला हाऊसिंग ट्रस्टचे पदाधिकारी.*

यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष रो. देवेंद्र कोठारी आणि सचिव रो. आशिष चौधरी यांनी प्रत्येक वर्गात जाऊन विद्यार्थ्यांकडून पर्यावरण संरक्षणाची शपथ घेतली. वृक्षारोपणाचे महत्त्व, वाढते तापमान, पाणीटंचाई, जैवविविधतेचे संरक्षण आणि पर्यावरणीय संतुलन राखण्याची गरज याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती देण्यात आली. प्रत्येक विद्यार्थ्याने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प केला.

या कार्यक्रमास विद्यार्थिनी, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पर्यावरणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनीही या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत पर्यावरण रक्षणासाठी आपले योगदान देण्याची तयारी दर्शविली.

या दोन्ही प्रकल्पांना रोटरी क्लब, अमळनेरच्या नूतन कार्यकारिणीचे विशेष सहकार्य लाभले. यामध्ये नूतन अध्यक्ष रो. महेश पाटील, नूतन सचिव तथा उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, रो. चेलाराम सेनानी, डॉ. अनिल वाणी, सनी कोठारी, प्रीतपाल सिंग बग्गा, अजय रोडगे, आशिष चौधरी यांच्यासह अनेक रोटेरियन्स सहभागी झाले होते. तसेच महिला हाऊसिंग ट्रस्टच्या सर्व महिला सदस्यांनी या अभियानाच्या यशस्वितेसाठी मोलाचे योगदान दिले.



*अमळनेर : येथील रोटरी क्लबतर्फे बुधवार, दि. १ जुलै रोजी डॉक्टर्स डे व सीए डे निमित्त शहरातील मान्यवर डॉक्टर व चार्टर्ड अकाउंटंट यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना अध्यक्ष महेश पाटील, उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, चेलाराम सैनानी, सनी कोठारी, कीर्तीकुमार कोठारी आदी.*

# रोटरी क्लबतर्फे डॉक्टर्स डे व सीए डे निमित्त अभिष्टचिंतन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील रोटरी क्लबतर्फे बुधवार, दि. १ जुलै रोजी डॉक्टर्स डे व सीए डे निमित्त शहरातील मान्यवर डॉक्टर व चार्टर्ड अकाउंटंट यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी डॉ. राहुल मुठे, डॉ. कौस्तुभ वानखेडे, डॉ. प्रसन्ना जोशी, डॉ. शरद बाविस्कर, डॉ. जी. एम. पाटील, डॉ. विशाल जोशी, डॉ. प्रीतम जैन, डॉ. किरण बडगुजर, डॉ. अनिल वाणी, डॉ. सौरभ जैन, डॉ. निलेश जैन यांच्यासह सीए आकाश वर्मा, कीर्ती कोठारी यांचा गौरव करण्यात आला.

'कोरोना' काळापासून आजपर्यंत अहोरात्र सेवा देणाऱ्या डॉक्टरांच्या कार्याला सलाम करण्यासाठी आणि आर्थिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या सीएंना प्रोत्साहन देण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी नूतन अध्यक्ष महेश पाटील व नूतन सचिव, उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, चेलाराम सैनानी, सनी कोठारी, कीर्तीकुमार कोठारी, अविनाश अमृतकर, प्रतीक शाह, विनोद थोरात आदींसह रोटरी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# बाबा बर्फानी कोण आहेत?

## त्यांच्या दर्शनासाठी लाखो भाविक का करतात कठीण यात्रा? भाग्यवंतांनाच मिळते दर्शन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

देशातील सर्वात पवित्र आणि कठीण धार्मिक यात्रांपैकी एक असलेल्या अमरनाथ यात्रेला सुरुवात झाली आहे. शुक्रवार, दि. ३ जुलैपासून पहलगाम मार्गे सुरू होणारी ही यात्रा ५७ दिवस चालणार असून, दि. २८ ऑगस्ट २०२६ रोजी तिची सांगता होणार आहे. दरवर्षी लाखो शिवभक्त हिमालयातील उंच डोंगर, कठीण प्रवास आणि प्रतिकूल हवामानाचा सामना करत बाबा बर्फानींच्या दर्शनासाठी अमरनाथ गुहेपर्यंत पोहोचतात.

**बाबा बर्फानी कोण आहेत?**

अमरनाथ गुहेत नैसर्गिकरित्या तयार होणाऱ्या बर्फाच्या शिवलिंगाला भाविक प्रेमाने 'बाबा बर्फानी' असे संबोधतात. हिंदू धर्मातील श्रद्धेनुसार हे भगवान शंकरांचे स्वयंभू स्वरूप मानले जाते. विशेष म्हणजे हे हिमलिंग दरवर्षी नैसर्गिकरित्या तयार होते आणि चंद्राच्या कलांप्रमाणे त्याचा आकार कमी–जास्त होत असल्याचे मानले जाते.

**दर्शन का होत नाही?**

बाबा बर्फानींचे दर्शन पूर्णपणे निसर्गावर अवलंबून असते. गुहेतील तापमान कमी असेपर्यंत बर्फाचे शिवलिंग कायम राहते. मात्र उन्हाची तीव्रता वाढली किंवा तापमान वाढले की हे हिमलिंग हळूहळू वितळू लागते. यामुळे यात्रेच्या सुरुवातीला अनेक भाविकांना हिमलिंगाचे दर्शन होते, पण नंतर काही वेळा ते पूर्णपणे वितळते. त्यामुळे अनेकांच्या मते, ज्यांच्यावर भगवान शंकरांची कृपा असते, त्यांनाच बाबा बर्फानींचे प्रत्यक्ष दर्शन घडते, अशी श्रद्धा आहे.

**हिमलिंग वितळल्यानंतर काय होते?**

हिमलिंग वितळल्यानंतरही अमरनाथ यात्रा थांबत नाही. गुहेतील पवित्र स्थळी नियमित पूजा–अर्चा सुरूच राहते. भाविक त्या स्थानाचे दर्शन घेऊन पूजा करतात आणि शिवाचा आशीर्वाद घेतात.

**अमरनाथ गुहेचे धार्मिक महत्त्व**

पौराणिक कथेनुसार, भगवान शंकरांनी याच अमरनाथ गुहेत माता पार्वतींना अमरत्वाचे रहस्य सांगितले होते. ही कथा कोणालाही ऐकू येऊ नये म्हणून त्यांनी नंदी, चंद्र, सर्प, गणेश आणि पंचमहाभूतांचा त्याग करून एकांत स्थळ म्हणून अमरनाथ गुहेची निवड केली होती. याच कारणामुळे अमरनाथ गुहेला विशेष धार्मिक महत्त्व प्राप्त झाले असून, दरवर्षी लाखो भाविक मोठ्या श्रद्धेने या पवित्र यात्रेत सहभागी होतात.

# मंदिर पुनर्बांधणीसह 'ब' वर्ग तीर्थक्षेत्रासाठी मदत करू

पान १ वरून

करून आवश्यक माहिती जाणून घेतली, याप्रसंगी ते बोलत होते.

मंत्री पाटील म्हणाले, की येथील नुकसानीचा सविस्तर अहवाल प्राप्त होताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि श्रीमती सुनेताताई पवार यांच्याशी चर्चा करून या मंदिराच्या पुनर्बांधणीसाठी तातडीने मदत उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहू.

यावेळी संत सखाराम महाराज वाडी संस्थानाचे अध्यक्ष तथा प्रमुख विश्वस्त प. पू. प्रसाद महाराज (गुरू ज्ञानेश्वर महाराज), विश्वस्त रविकांत देशमुख, जयंत मोडक, एकनाथ सातपूरकर, प्रसाद नाईक, संस्थानाचे सल्लागार राजेंद्र भामरे, महेश कोठावदे, उदय देशपांडे, नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर, उपनगराध्यक्ष प्रशांत निकम, प्रांताधिकारी मयूर भंगाळे, तहसीलदार रूपेशकुमार सुराणा, उपविभागीय पोलीस अधिकारी विनायक कोते, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, नगरसेवक पंकज भोई, पांडू भोई, गुलाब पाटील, श्रीराम चौधरी, नाना धनगर, सूरज परदेशी, भैय्या परदेशी, सुरेश अर्जुन पाटील, संजय पाटील, रवी पाटील, पालिकेचे व संबंधित विभागांचे अधिकारी, सेवेकरी, आजी–माजी लोकप्रतिनिधी तसेच भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी आगीवर तातडीने नियंत्रण मिळवून मोठी हानी टाळणाऱ्या अमळनेर पालिकेच्या अग्नीशमन विभागाच्या कार्याचा मंत्री पाटील यांनी विशेष गौरव केला. अग्नीशमन अधिकारी गणेश गोसावी तसेच कर्मचारी दिनेश बिऱ्हाडे, फारूक शेख, जफर पठाण, सत्येन संदानशीव, आनंद झिम्बल, मच्छिंद्र चौधरी, भिका संदानशीव, रफीक पठाण, आकाश संदानशीव, लखन कंखरे, आकाश बाविस्कर आणि अजय बिऱ्हाडे यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

## शनिशिंगणापूरच्या भाविकांसाठी आनंदाची बातमी!

पान १ वरून

यापूर्वी भोजनालयाचे नूतनीकरण, ई–टेंडर प्रक्रिया, स्वयंपाकगृहाचे आधुनिकीकरण तसेच स्वच्छतेची सर्व कामे पूर्ण करण्यात आली. राज्य सरकारने विश्वस्त मंडळ बरखास्त केल्यानंतर विभागीय आयुक्त तथा देवस्थानचे प्रशासक डॉ. प्रविण गेडाम यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अतुल चोरमारे यांच्या देखरेखीखाली ही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

प्रसादालयातील आधुनिक स्वयंपाकगृहामुळे भाविकांना स्वच्छ, सात्त्विक आणि दर्जेदार भोजन मिळणार आहे. फक्त ५० रुपयांमध्ये प्रसाद भोजनाचे ताट उपलब्ध असून त्यामध्ये पोळी, भाजी, भात, वरण आणि एक गोड पदार्थ यांचा समावेश असेल. भाविकांच्या सोयीसाठी पुन्हा सुरू झालेली ही सेवा निश्चितच दिलासादायक ठरणार असून, शनिशिंगणापूरला भेट देणाऱ्यांसाठी ही आनंदाची बातमी आहे.

# आषाढी यात्रा : मंदिर परिसर वाहन प्रतिबंध क्षेत्र घोषित

## जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी पारीत केला आदेश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आषाढी शुद्ध एकादशीला पंढरपूर शहरात मोठ्या प्रमाणात यात्रा भरते. आषाढी यात्रा सोहळ्यासाठी सुमारे १२ ते १५ लाख भाविक पंढरपूरला येतात. भाविकांची सुरक्षितता व यात्रा सुकर होणेचे दृष्टीने आपत्ती व्यवस्थापन अधिनयम २००५ मधील कलम ३४ (ब) नुसार मंदिर परिसर वाहन प्रतिबंध क्षेत्र म्हणून घोषीत करण्यात आल्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण एस. कार्तीकेयन यांनी पारीत केला असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली .

पंढरपूर शहरातील श्रीकृष्ण मंदिर, चौफाळा ते श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिर पश्चिमद्वार, मंदिर परिसर ते महाद्वार चौक परीसर दि. १ ते १५ जुलै २०२६ या कालावधीत सकाळी ५.०० वाजेपासून ते रात्री १०.०० वाजेपर्यंत व दि. १५ जुलैनंतर २९ जुलै २०२६ पर्यंत २४ तास सदर परिसर वाहन प्रतिबंध क्षेत्र म्हणून घोषीत करण्यात आला आहे.



आषाढी यात्रा कालावधीत शहरात येणाऱ्या भाविकांची संख्या पाहता श्रीकृष्ण मंदिर, चौफाळा श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिर पश्चिमद्वार, मंदिर परिसर, महाद्वार चौक परिसर या भागात भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात असते. तसेच या भागातून भाविक दर्शनरांगेकडे व मंदिराकडे पायी चालत जात असतात. अशा वेळी बऱ्याच ठिकाणी प्रदक्षिणा मार्गावर, जागोजागी दुचाकी व चारचाकी वाहने पार्किंग केलेले असतात. यामुळे भाविकांना रस्त्यावरून ये–जा करण्यास अडचण निर्माण होते. येणाऱ्या दुचाकी, चारचाकीमुळे अपघाताची जास्त शक्यता व रस्त्यावर गर्दी वाढून रहदारीच्या समस्या निर्माण होतात. यामुळे गर्दी व्यवस्थापनाकरिता प्रशासनास अडचणी निर्माण होतात. शहर व परिसरातील वाहतूक व दर्शनरांग सुरळीतपणे चालण्यासाठी व यात्रा कालावधीत शांतता व सुरक्षितता राहावी, यासाठी वाहन प्रतिबंधक आदेश पारीत करण्यात आले आहेत.

श्रीकृष्ण मंदिर, चौफाळा ते श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिर पश्चिम द्वार, मंदिर परिसर, महाद्वार चौक परिसरात दुचाकी, चारचाकी व इतर सर्व वाहने चालविण्यास व लावण्यास (पार्किंग) मनाई करण्यात आली आहे. तसेच मंदिर परिसरातील छोट्या–छोट्या अरुंद रस्त्यावर वाहने लावण्यास मनाई करण्यात आली आहे. शासकीय सेवा, अत्यावश्यक सेवा, मंदिर परिसरात राहणारे, मंदिरात कामकाज करणाऱ्या व्यक्तींच्या वाहनांसाठी पोलीस प्रशासनाकडून पास प्राप्त झाल्यानंतर सदरच्या आदेशातून सूट राहील. तथापि, शासकीय कर्तव्य, मंदिरातील कर्तव्य याशिवाय इतर बाबींसाठी शासकीय व मंदिर समितीचे वाहन, कर्मचारी वाहन याचा वापर केला जाणार नाही, अन्यथा कडक कारवाई केली जाईल.

या कालावधीमध्ये येणाऱ्या भाविकांच्या वाहनाची पार्किंग व्यवस्था पंढरपूर नगर परिषदेमार्फत करण्यात यावी. मंदिर परिसरात राहणारे, कामकाज करणाऱ्या व्यक्तींकरिता वारी कालावधीसाठी पोलीस प्रशासनाकडून पास घ्यावेत. पासधारकांना वैयक्तीक कारणासाठी मुभा राहणार नाही, वाहन पास धारकांनी ठरवून दिलेल्या जागेतच वाहन पार्किंग करावे. मंदिर परिसरात व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांच्या मालाची ने–आण करण्यासाठी पोलीस प्रशासनाशी चर्चा करून भाविकांची गैरसोय होणार नाही, अशी ठराविक वेळ निश्चित करून त्या दरम्यान वाहतूक होईल, याची दक्षता घ्यावी. महत्त्वाचे तसेच राजशिष्टाचार पात्र व्यक्तींसाठी तसेच दिव्यांग व्यक्तीसाठी श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिरे समितीने श्रीकृष्ण मंदिर, चौफाळ्यापासून ने–आण करणेकामी पर्यावरणपूरक वाहनांची व्यवस्था करावी. आदेशाची अंमलबजावणी काटेकोरपणे होण्याच्या दृष्टीने वाहन प्रतिबंध क्षेत्रामध्ये अनधिकृतपणे वावरणाऱ्या वाहनावर शहर पोलीस निरीक्षकांनी जप्तीची कारवाई करून सदर वाहने पोलीस ठाणे पंढरपूर येथे दंडात्मक कारवाईसाठी जमा करण्यात यावीत.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# मां बनने के ४८ घंटे बाद दी परीक्षा

## २३ साल की उम्र में ड्राइवर की पत्नी बन गईं जज

सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

किसी भी महिला के लिए मां बनना जिंदगी का सबसे बड़ा पल होता है लेकिन तमिलनाडु की रहने वाली श्रीपति ने इसी दौर में ऐसा फैसला लिया जिसने उन्हें पूरे देश में पहचान दिला दी। बेटी को जन्म देने के महज दो दिन बाद उन्होंने करीब २०० किलोमीटर का सफर तय करके सिविल जज की परीक्षा दी और कुछ समय बाद सिर्फ २३ साल की उम्र में सिविल जज बनकर इतिहास रच दिया। वह तमिलनाडु के मलैयाली आदिवासी समुदाय की पहली महिला सिविल जज बनीं। उनकी कहानी आज लाखों युवाओं खासकर बेटियों के लिए प्रेरणा बन चुकी है।

### छोटे से गांव में बीता बचपन

श्रीपति का जन्म तमिलनाडु के तिरुवन्नामलाई जिले के दूर-दराज स्थित धनियाक्कुप्पम गांव में हुआ। यह गांव रिजर्व फॉरेस्ट एरिया में आता है जहां आज भी बुनियादी सुविधाओं की कमी है। गांव तक पहुंचना आसान नहीं है। अच्छी सड़कें नहीं हैं और सबसे नजदीकी बस स्टॉप भी करीब १५ किलोमीटर दूर है.ऐसे इलाके में रहने वाले बच्चों के लिए अच्छी शिक्षा हासिल करना आसान नहीं होता, लेकिन श्रीपति ने शुरू से ही पढ़ाई को अपनी ताकत बनाया।

### गरीब परिवार, लेकिन पढ़ाई से समझौता नहीं

श्रीपति के पिता मजदूरी और खेती करके परिवार चलाते थे। उनकी मां मल्लिका गृहिणी थीं और परिवार की जिम्मेदारियां संभालती थीं। आर्थिक स्थिति मजबूत नहीं थी, लेकिन माता-पिता चाहते थे कि उनके बच्चे पढ़-लिखकर बेहतर जीवन जी सकें। बाद में परिवार बच्चों की पढ़ाई के लिए गांव छोड़कर दूसरे स्थान पर रहने चला गया। श्रीपति के अलावा उनके भाई-बहन सरन्या और सूर्यप्रकाश की पढ़ाई पर भी परिवार ने पूरा ध्यान दिया।

### स्कूल में शुरू से ही थीं होनहार छात्रा

श्रीपति ने पहली से १२वीं तक की पढ़ाई स्थानीय निजी स्कूल में पूरी की। बाद में उन्होंने हायर सेकेंडरी में प्योर साइंस विषय चुना और वर्ष २०१६-१७ में अपनी स्कूली शिक्षा पूरी की। उनके स्कूल के शिक्षक आज भी उन्हें शांत स्वभाव लेकिन मजबूत इरादों वाली छात्रा के रूप में याद करते हैं। स्कूल के प्रिंसिपल ने एक इंटरव्यू में बताया कि श्रीपति हमेशा पढ़ाई में अच्छी थीं और उन्होंने स्कूल की परीक्षाओं में ७५ प्रतिशत से अधिक अंक हासिल किए थे। स्कूल छोड़ने के बाद भी वह समय-समय पर अपने शिक्षकों से मिलने आती थीं।

### जज बनने का सपना

श्रीपति के मन में जज बनने का सपना अचानक नहीं आया। बचपन से उन्होंने अपने आदिवासी समाज के लोगों को कानूनी जानकारी के अभाव में परेशान होते देखा। उन्हें महसूस हुआ कि उनके समुदाय के लोग अपने अधिकारों से अनजान हैं और कई बार न्याय मिलने के बावजूद उसका लाभ नहीं उठा पाते। तभी उन्होंने तय किया कि वह कानून की पढ़ाई करेंगी और न्याय व्यवस्था का हिस्सा बनेंगी। एक इंटरव्यू में श्रीपति ने कहा था कि उनका सबसे बड़ा उद्देश्य अपने समाज के लोगों को कानूनी मदद दिलाना है, क्योंकि उन्हें अपने अधिकारों की जानकारी बहुत कम होती है।

### शुरू की यूपीएससी की तैयारी

स्कूल के बाद श्रीपति ने बैचलर ऑफ लॉ (एलएलबी) की पढ़ाई की। कॉलेज के दिनों से ही उन्होंने तमिलनाडु पब्लिक सर्विस कमीशन की सिविल जज परीक्षा की तैयारी शुरू कर दी। उन्होंने प्रतियोगी परीक्षाओं की तैयारी पर पूरा ध्यान दिया। उनका लक्ष्य सिर्फ वकील बनना नहीं था बल्कि न्यायपालिका का हिस्सा बनकर समाज में बदलाव लाना था।

### शादी के बाद भी नहीं छोड़ा अपना सपना

श्रीपति की शादी कम उम्र में ही हो गई। उनके पति ट्रक ड्राइवर हैं.ग्रामीण इलाकों में अक्सर शादी के बाद लड़कियों की पढ़ाई और करियर रुक जाते हैं, लेकिन श्रीपति के साथ ऐसा नहीं हुआ। उन्होंने शादी के बाद भी अपनी तैयारी जारी रखी। किताबें, नोट्स और पढ़ाई उनकी रोजमर्रा की जिंदगी का हिस्सा बने रहे। इस दौरान उनके पति और परिवार ने उनका पूरा साथ दिया। घर की जिम्मेदारियों के बीच भी उन्होंने सिविल जज बनने का सपना नहीं छोड़ा।

### मां बनने के सिर्फ दो दिन बाद पहुंच गईं परीक्षा देने

नवंबर २०२३ में श्रीपति ने एक बेटी को जन्म दिया। आमतौर पर इस समय महिलाएं अस्पताल या घर पर आराम कर रही होती हैं, लेकिन श्रीपति के सामने सिविल जज परीक्षा थी। बेटी के जन्म के सिर्फ दो दिन बाद उन्होंने अपने पति के साथ लगभग २०० किलोमीटर का सफर तय किया और परीक्षा केंद्र पहुंचीं। उस समय उनकी नवजात बेटी परिवार के पास थी। सोशल मीडिया पर उनकी एक तस्वीर काफी वायरल हुई, जिसमें वह अपनी छोटी बच्ची को गोद में लेकर सफर करती नजर आ रही थीं. इस तस्वीर के पीछे उनका दर्द, संघर्ष और अपने लक्ष्य के प्रति अटूट समर्पण छिपा था।

### २३ साल की उम्र में बन गईं सिविल जज

श्रीपति की मेहनत आखिरकार रंग लाई। उन्होंने तमिलनाडु सिविल जज परीक्षा पास कर ली और केवल २३ साल की उम्र में सिविल जज बन गईं। इसके साथ ही उन्होंने इतिहास रच दिया। वह तमिलनाडु के मलैयाली आदिवासी समुदाय की पहली महिला सिविल जज बन गईं। यह उपलब्धि सिर्फ उनके परिवार की नहीं बल्कि पूरे समुदाय के लिए गर्व का पल थी।

### गांव में हुआ जोरदार स्वागत

जब श्रीपति के जज बनने की खबर उनके गांव पहुंची तो वहां खुशी की लहर दौड़ गई.गांव वालों ने ढोल-नगाड़ों के साथ उनका स्वागत किया। उन्हें फूलों की मालाएं पहनाई गईं और जुलूस निकालकर सम्मानित किया गया। लोगों को पहली बार लगा कि उनके समुदाय की बेटी भी न्यायपालिका जैसे बड़े पद तक पहुंच सकती है। श्रीपति की इस उपलब्धि की चर्चा पूरे तमिलनाडु में हुई। राज्य के तत्कालीन मुख्यमंत्री एम. के. स्टालिन ने भी सोशल मीडिया के जरिए उन्हें बधाई दी और उनके संघर्ष की सराहना की। उनकी सफलता को महिला सशक्तिकरण और आदिवासी समाज के लिए प्रेरणादायक उपलब्धि बताया गया।

### आज लाखों युवाओं के लिए प्रेरणा हैं श्रीपति

श्रीपति की कहानी बताती है कि मजबूत इरादों के सामने परिस्थितियां छोटी पड़ जाती हैं। गरीबी, दूर-दराज का गांव, सीमित संसाधन, शादी और मां बनने जैसी बड़ी जिम्मेदारियां भी उन्हें अपने लक्ष्य से नहीं डिगा सकीं। आज वह सिर्फ एक सिविल जज नहीं हैं, बल्कि उन लाखों युवाओं और बेटियों के लिए प्रेरणा बन चुकी हैं जो कठिन हालात के बावजूद अपने सपनों को पूरा करना चाहती हैं। उनकी कहानी यह संदेश देती है कि अगर लक्ष्य स्पष्ट हो और मेहनत सच्ची हो तो कोई भी मुश्किल मंजिल तक पहुंचने से नहीं रोक सकती।



# पोटदुखीपासून सर्दी-खोकल्यापर्यंत; ओव्याच्या पानांचे फायदे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

प्रत्येक भारतीय स्वयंपाक घरात सर्रास आढळून येणारा पदार्थ म्हणजे ओवा पराठा, भाजणी, चकली, भजी अशा अनेक पदार्थांमध्ये ओवा घातला जातो. ओव्यामुळे पोटाविषयीच्या अनेक तक्रारी दूर होतात. त्यामुळे कायम डाळीच्या पीठाचे ( बेसन) कोणतेही पदार्थ करायचे असतील तर त्यात ओवा घातला जातो. ओव्यामुळे पोटदुखी, पोटात गॅस होणे अशा समस्या दूर होतात. त्यामुळे ओवा हा कायम प्रत्येकाचा घरात असतो. विशेष म्हणजे केवळ ओवाच कशाला त्याची पानेदेखील तितकीच गुणकारी आहेत. मऊसर हिरवी दिसणारी ही पाने अनेक आजारांवर गुणकारी आहे. म्हणूनच ओव्याप्रमाणेच त्याच्या पानांचे गुणधर्म व फायदे कोणते ते जाणून घेऊया.



### ओव्याची पाने खाण्याचे फायदे

**१) बॉडी डिटॉक्स होते :** ओव्याची पाने हे एक उत्तम नैसर्गिक डिटॉक्स आहे. या पानांचा काढा शरीरासाठी अत्यंत फायदेशीर आहे. त्यामुळे थोडी ओव्याची व तुळशीची पाने एकत्र करून त्याचा काढा तयार करावा. त्यानंतर त्यात २-३ थेंब लिंबाचा रस मिक्स करावा व हा काढा घ्यावा. त्यामुळे शरीर डिटॉक्स होण्यासोबतच शरीराचे हायड्रेशनदेखील होते.

**२) पोटदुखी दूर होते :** साधारणपणे कधीही आपले पोट दुखू लागले की आपण ओवा खातो. त्याचप्रमाणे जर तुमच्या घरी ओव्याचे झाड असेल तर ओव्याऐवजी त्याची पाने खा. या पानोमुळे पोटदुखी दूर होण्यासोबतच गॅस्ट्रोइंटेस्टइनची समस्यादेखील बरी होते.

**३) पचनक्रिया सुधारते :** आपले अन्नपचन जर नीट झाले नाही तर अनेक शारीरिक समस्या डोके वर काढतात. यात पोटदुखी, ॲसिडिटी, जळजळ, पित्त होणे अशा समस्या हमखास होतात. त्यामुळे दिवसातून एकदा तरी ओव्याचे कोवळे पान खावे. त्यामुळे पचनक्रिया सुधारते व भूकदेखी वाढते.

**४) तोंडाची दुर्गंधी दूर होते :** दिवसभर आपण अनेक वेगवेगळे पदार्थ खात असतो. त्यामुळे सहाजिकच हे अन्न कण दातांमध्ये अडकून तोंडाला दुर्गंधी येते. म्हणूनच ही दुर्गंधी दूर करायची असेल तर दररोज जेवण झाल्यावर ओव्याचे पान खावे.

**५) सर्दी-खोकला बरा होतो :** सर्दी किंवा खोकला झाल्यास ओव्याची ७-८ पाने घेऊन ते एक ग्लास पाण्यात उकळवावीत. त्यानंतर हे पाणी अर्धा ग्लास होईल इतके आटवावे. त्यानंतर हे पाणी गार झाल्यावर गाळून त्यात मध टाकून प्यावे.

# जेवल्यानंतर एक मूठभर भाजलेले शेंगदाणे आरोग्यासाठी ठरतील फायदेशीर!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जेवल्यानंतर मूठभर भाजलेले शेंगदाणे खाण्याची सवय आरोग्यासाठी खूप फायदेशीर ठरू शकते. शेंगदाण्याला 'गरिबांचे बदाम' म्हटले जाते. कारण यामध्ये महागड्या ड्रायफ्रूट्सइतकेच पोषक घटक असतात.

शेंगदाण्यामध्ये उत्तम प्रमाणात फायबर असते. जेवल्यानंतर मूठभर शेंगदाणे खाल्ल्याने पचनक्रिया गतिमान होते, लाळ आणि पाचक रसांची निर्मिती वाढते. ज्यामुळे खाल्लेले अन्न नीट पचण्यास मदत होते. शेंगदाण्याचा ग्लायसेमिक इंडेक्स खूप कमी असतो. जेवणानंतर रक्तातील साखर एकदम वाढण्याची शक्यता असते. अशा वेळी शेंगदाणे खाल्ल्यास त्यातील प्रोटीन आणि फॅट्स रक्तातील साखरेची पातळी स्थिर ठेवण्यास मदत करतात. स्वीट क्रेव्हींग कमी होतील अनेक लोकांना जेवल्यानंतर काहीतरी गोड खाण्याची तीव्र इच्छा होते. गोड पदार्थांऐवजी मूठभर शेंगदाणे खाल्ल्याने पोट भरल्यासारखे वाटते आणि वजन वाढवणाऱ्या साखरेपासून सुटका मिळते. जर जेवल्यानंतर तुम्हाला आळस किंवा सुस्ती येत असेल, तर शेंगदाणे उत्तम ऊर्जा देण्याचे काम करतात. यामध्ये असणारे निरोगी फॅट्स आणि प्रोटीन्स शरीराला थकवा जाणवू देत नाहीत.

शेंगदाण्यामध्ये मोनोअनसॅच्युरेटेड आणि पॉलीअनसॅच्युरेटेड फॅट्स असतात. हे शरीरातील 'बॅड कोलेस्टेरॉल' कमी करून 'गुड कोलेस्टेरॉल' वाढविण्यास मदत करतात, ज्यामुळे हृदयाचे आरोग्य चांगले राहते. यामध्ये व्हिटॅमिन ई आणि झिंक भरपूर प्रमाणात असते. जेवणानंतर याचे नियमित सेवन केल्याने त्वचेवर चमक येते आणि केस मजबूत होतात.



**हे लक्षात ठेवा**

शेंगदाणे खाताना ते भाजलेले आणि मिठाशिवाय असावेत. खारे किंवा तळलेले शेंगदाणे खाल्ल्यास फायद्यांऐवजी नुकसान होऊ शकते. मूठभर शेंगदाणे सुमारे २० ते २५ ग्रॅम प्रमाण पुरेसे आहे. अतिप्रमाणात खाल्ल्याने वजन वाढू शकते किंवा गॅसचा त्रास होऊ शकतो.

# वजनानुसार किती पाणी प्यावे?

**जाणून घ्या पाण्याचे योग्य प्रमाण किती?**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सामान्यतः प्रतिकिलो वजनामागे ३० ते ३५ मि.ली. पाणी पिणे गरजेचे असते. उदा.- ६० किलो वजन असल्यास दिवसाला सुमारे १.८ ते २.१ लिटर पाणी पिणे योग्य ठरू शकते.

### वजनानुसार अंदाजे पाण्याचे प्रमाण

- ५० किलो : १.५ ते १.८ लिटर.
- ६० किलो : १.८ ते २.१ लिटर.
- ७० किलो : २.१ ते २.५ लिटर.
- ८० किलो : २.४ ते २.८ लिटर.
- ९० किलो : २.७ ते ३.२ लिटर.
- एकदम नाही, थोड्या-थोड्या वेळाने पाणी प्या.
- एकाच वेळी जास्त पाणी पिण्यापेक्षा दिवसभरात थोड्या-थोड्या अंतराने पाणी पिणे शरीरासाठी अधिक फायदेशीर ठरते.
- व्यायाम करत असाल तर पाण्याचे प्रमाण वाढवा.
- घाम जास्त येत असल्यास किंवा नियमित व्यायाम करत असल्यास अतिरिक्त ५०० मि.ली. ते १ लिटर पाणी पिण्याची गरज भासू शकते.
- तहान लागण्याची वाट पाहू नका.
- तहान लागणे हे शरीरात पाण्याची कमतरता सुरू झाल्याचे लक्षण असू शकते. त्यामुळे वेळोवेळी पाणी पिण्याची सवय लावा.

### हवामानानुसार पाणी पिणे महत्त्वाचे

उन्हाळ्यात, दमट हवामानात किंवा ताप आल्यास शरीराला अधिक पाण्याची गरज असते. अशावेळी पाण्याचे प्रमाण वाढविणे आवश्यक आहे.

### पाण्याचे फायदे

योग्य प्रमाणात पाणी प्यायल्याने पचन सुधारते, शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडण्यास मदत होते, त्वचा निरोगी राहते, थकवा कमी होतो आणि वजन नियंत्रणात ठेवण्यासही मदत मिळू शकते.











## मना सज्जना...

## बहुतांपरी हेच आतां धरावे । रघुनायका आपुलेसे करावे ॥

परम स्नेही मित्र हो,

**बहुतांपरी हेच आतां धरावे ।**
**रघुनायका आपुलेसे करावे ॥**
**दीनानाथ हे तोडरी ब्रीद गाजे ।**
**मना सज्जना राघवी वस्ती कीजे ॥४२॥**

आपल्या या श्लोकांच्या अभ्यासात एक गोष्ट तुमच्या लक्षात आली का?

समर्थांनी श्लोक क्रमांक ३८ ते ४२ अशा पाचही श्लोकांच्या शेवटी 'मना सज्जना राघवी वस्ती कीजें' असे चरण योजले आहे. ते सारखेच आहे. समर्थानीं या पाच श्लोकांपैकी ३८ व्या श्लोकात श्रीरामचंद्रांचे ध्यान करावयाला सांगितले आहे. ३९ व्या श्लोकात चित्त एकाग्र करायला सांगितले आहे. ४० व्या श्लोकात प्रभू श्रीरामचंद्रांच्या चरणावर लक्ष ठेवून कल्पनेचा विलय आणि मनावर नियंत्रण करायला सांगितले आहे. ४१ व्या श्लोकामध्ये अपारभक्तीच्या द्वारे विचाराने मनाचे प्रबोधन करून प्रभू श्रीरामचंद्रांना आपलेसे करून घ्यायला सांगितले आहे.

हा सारा भक्तीमार्ग टप्प्याटप्प्याने समर्थांनी आपल्याला बोधित केलेला आहे. यास्तव 'मनाचे श्लोक' हे काव्य भक्तीमार्गाच्या वाटेवर मार्गदर्शन करणारे एक 'मनोपनिषद' आहे.

आपल्या धर्मात अनेक पंथ आणि संप्रदाय आहेत. त्यांची वेगवेगळी दैवते आहेत. त्यांच्या वेगवेगळ्या उपासना पद्धती आहेत. असंख्य भक्त मंडळी आहेत. तथापी सर्वांना एकाच देवाचा ध्यास लागलेला आहे. तेव्हा समर्थ मनाला सांगताहेत,

"हे मना तू निसंकोचपणे रघुनायकाला शरण जा. त्यांच्या भक्तीत तल्लीन हो. साधनेने रघुनायकांना आपलेसे करून घे. याने जीवनाचे सार्थक होईल. भक्तांच्या रक्षणाचे ब्रीद रघुनायकाने सांभाळले आहे. तो दासाभिमानी, भक्त अभिमानी आणि दिनांचा कैवारी आहे. तेव्हा, हे मना.. आपल्या ठाई राघवाची स्थापना करून घे."

कारण भक्त आणि भगवंत यांच्यातील अंतर हे भक्तीनेच मिटते.

पुढील श्लोकात असेच आवाहन ते मनाला करताहेत.

**मना सज्जना येक जीवी धरावे ।**
**जनी आपले हित तुवां करावे ॥**
**रघुनायकाविण बोलों नको हो ।**
**सदा मानसी तो निजध्यास राहो ॥४३॥**

जीवनात एक ध्येय असावे. ते म्हणजे परमार्थ साधणे. कारण जन्माला आलेल्या जीवाचे कल्याण त्यातच आहे. शेवटी आपले हित अहित हे सारे मनोव्यापारात आहे.

मनाने सदैव आपुले हित कशात आहे ते ओळखावे. त्यासाठी जागृत राहावे. व्यर्थ भाषण, संभाषण टाळावे. उगाच वाणी शिनवू नये. बोलावयाचे झाल्यास रामनाम बोलावे, त्याचा जप करावा. अन्यथा मौन राहावे. श्रवण, मनन आणि चिंतन रामनामाचेच असावे.

नववीधा भक्तीमध्ये तिसरी भक्ती 'नामस्मरण भक्ती' आहे. समर्थ या भक्तीचे महत्त्व दासबोधाचे चौथ्या दशकाचे तिसऱ्या समासात स्पष्ट करतात...

**नामे पाषाण तरले । असंख्यात भक्त उद्धरले ।**
**महापापी तेची झाले । परम पवित्र ॥**
**परमेश्वराची अनंतनामे । स्मरता तरिजे नित्यनेमे ।**
**नामस्मरण करिता येमे । बाधिजेना ॥**
**सहस्रनामांमध्ये कोणी एक । म्हणतां होतसे सार्थक ।**
**नाम स्मरतां पुण्यश्लोक । होईजें स्वये ॥**
**काहीच न करूनि प्राणी । रामराम जपे वाणी ।**
**तेने संतुष्ट चक्रपाणी । भक्तांलागी सांभाळी ॥**

पुढे नामाचे महत्त्व सांगताना ते म्हणतात–

**नाम स्मरे निरंतर । तें जाणावें पुण्य शरीर ।**
**महादोषांचे गिरीवर । रामनामें नासती ॥**
**अगाध महिमा न वचे वदला । नामें बहु जन उद्धरला ।**
**हळहळापासून सुटला । प्रत्यक्ष चंद्रमौळी ॥**
**चहुं वर्णा नामाधिकार । नामीं नाहीं लाहानथोर ।**
**जड मूढ पैलपार । पावती नामें ॥**
**म्हणून अखंड स्मरावे । रूप मनी आठवावे ।**

असा हा नामाचा अगाध महिमा समर्थ मनाला पटवून देतांना म्हणतात...

सदा मानसी तो निज ध्यास राहो!

**जय जय रघुवीर समर्थ!**

**भाऊसाहेब देशमुख, अमळनेर.**
**मो. : 94203 89541**

# सूर्य देवाचे 'सप्ताश्वरूप' आणि त्याचे महत्त्व

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मात सूर्य देवतेला अत्यंत पवित्र मानले आहे. सूर्य देवतेला जीवनाचा आणि शक्तीचा स्रोत मानले जाते. प्रत्येक दिवसाच्या सुरूवातीला सूर्याची पूजा केली जात आहे. कारण सूर्य भगवान केवळ एक प्रकाश देणारा तत्त्व नाही, तर तो आत्मज्ञान, आरोग्य, समृद्धी आणि जीवनाच्या संपूर्ण चक्राचा प्रतीक आहे. सूर्य देवतेचे 'सप्ताश्वरूप' म्हणजेच सूर्याच्या सात विविध रूपांचा उल्लेख आपल्या प्राचीन ग्रंथांमध्ये केलेला आहे. या सात रूपांचा प्रत्येक रूप विशेष महत्त्व राखतो.

सप्ताश्वरूपाची संकल्पना एक गूढ आणि आध्यात्मिक विचार प्रदान करणारी आहे. प्रत्येक रूपाची पूजा आणि त्याची महिमा विशेष प्रकारे वर्णन केलेली आहे. या लेखात, सूर्य देवाच्या सप्ताश्वरूपांची ओळख करून घेऊ आणि त्याचे महत्त्व समजून घेऊ.

### सप्ताश्वरूपाची परिभाषा

सूर्य देवतेच्या सप्ताश्वरूपामध्ये सात विशिष्ट रूपांचा समावेश आहे. प्रत्येक रूपाचा परिष्कृत उद्देश आणि कार्य आहे. हे रूपे निम्नलिखित आहेत.

### मध्यमरूप

हे रूप सूर्याचे मध्यभागी असलेले रूप आहे. या रूपात सूर्य देवतेची किमान तेजस्विता आणि दिव्यता असते. हा रूप शरीराच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वपूर्ण मानला जातो. कारण या रूपाच्या प्रकाशात शरीराची शुद्धीकरण प्रक्रिया सक्रिय होते.

### पूर्वरूप

सूर्योदयाच्या वेळी सूर्याचा उगम होतो. पूर्व दिशा ही नवीन आशा आणि जीवनाची प्रतीक मानली जाते. हे रूप त्या उत्साही वातावरणात उत्सव आणि नवनिर्मितीचा संदेश घेऊन येते. त्यामुळे त्याचे महत्त्व मानवाच्या मानसिक जागरणात आहे.

### पश्चिमरूप

सूर्याच्या अस्तावस्थेचा समय म्हणजेच सृष्टीतील संन्यास, निसर्गाच्या एका चक्राचा समारोप. पश्चिम दिशा निराश्रिततेचा आणि आत्मसंशोधनाचा संकेत आहे. या रूपाच्या पूजनाने आंतरिक शांती मिळविता येते.

### उत्तररूप

या रूपात सूर्य देवतेचा तेजस्वी, उंच आणि पवित्र रूप प्रकट होतो. उत्तर दिशा आध्यात्मिक उन्नतीची आणि उत्तम मार्गदर्शनाची द्योतक आहे. या रूपाची पूजा मानसिक शुद्धतेसाठी आणि जीवनातील चांगल्या कर्मांसाठी महत्त्वाची आहे.

### दक्षिणरूप

सूर्य देवतेचा हा रूप उष्णता आणि शक्तीचा प्रतीक मानला जातो. या रूपाची पूजा शारीरिक आरोग्य आणि सामर्थ्य प्राप्तीच्या दृष्टीने विशेष महत्त्वाची आहे.



### नैऋत्यरूप

दक्षिण-पश्चिम दिशा कधी-कधी धोक्याचा इशारा देणारी असते. या रूपाची पूजा संकटाशी मुकाबला करण्यासाठी आणि मानसिक स्थैर्य प्राप्त करण्यासाठी केली जाते. जीवनातील अडचणींना परत करण्यासाठी हा रूप प्रकट होतो.

### आग्नेयरूप

या रूपात सूर्य देवतेचा उग्र आणि प्रचंड तेजस्वी रूप प्रदर्शित होतो. या रूपात आदित्य या सूर्याला वाळवंटातील आग किंवा ज्वाला म्हणतात. या रूपाने अंतर्मनातील अंधकार आणि बुरे विचार नष्ट होतात. हा रूप ज्ञानाची ज्वाला प्रकट करणारा असतो.

### सप्ताश्वरूपाचे महत्त्व

दिव्यता आणि पवित्रता : सूर्याच्या प्रत्येक रूपाचे महत्त्व भक्तांच्या जीवनाच्या विविध अंगांमध्ये आपले स्थान ठेवते. प्रत्येक रूप आपल्या भक्ताला त्याच्या जीवनातील विविध अडचणींना पार करणारे दिव्य ज्ञान आणि प्रकाश देते.

### आध्यात्मिक प्रगती

सूर्य देवतेच्या सप्ताश्वरूपांची पूजा केल्याने एक भक्त आपल्यात आध्यात्मिक उन्नती साधू शकतो. प्रत्येक रूपाने जीवनाच्या विविध पैलूंवर प्रभुत्व ठेवले आहे आणि प्रत्येक रूप पूजा केल्याने त्यासंबंधित जीवनातील अडचणी दूर होतात.

### स्वास्थ्य लाभ

सूर्याची पूजा आपल्या शारीरिक आणि मानसिक आरोग्याला उत्तेजन देणारी आहे. विविध रूपांची पूजा करण्याने शरीराची शुद्धता व मानसिक शांती मिळविता येते. उदा.– 'मध्यमरूप' शारीरिक आरोग्याच्या दृष्टिकोनातून अत्यंत लाभकारी आहे.

### सृष्टीच्या चक्राचे समज

सप्ताश्वरूप हे सृष्टीच्या विविध चक्रांचा प्रतीक आहे. हे रूप त्या चक्रांच्या वर्तुळाचा एक भाग आहेत ज्यामुळे संसाराच्या एकात्मकतेचे आणि परिपूर्णतेचे दर्शन घडते.

### प्रकृतीशी एकात्मता

सूर्य देवतेच्या सप्ताश्वरूपात प्रत्येक रूप पृथ्वीच्या विविध दृष्टिकोनांची आणि प्रकृतीच्या विविध बाबींची ओळख करतो. या रूपांमधून निसर्गाशी अधिक जवळीक साधता येते.

### उदाहरण आणि प्रभाव

सप्ताश्वरूपाचा अनुभव : एक भक्त सूर्य देवतेच्या सप्ताश्वरूपांची पूजा करत आहे आणि त्याला आंतरिक शांती, शक्ती आणि बळ मिळते. त्याचे जीवन अधिक स्पष्ट होईल आणि त्याच्यात सकारात्मक ऊर्जा निर्माण होईल.

### संस्काराची महत्ता

सूर्योदय आणि सूर्यास्तावेळी प्रत्येक रूपाची पूजा केल्याने त्या रूपांतील गुण आपल्या जीवनात प्रकट होतात. उदा.– 'पूर्वरूप' या रूपात प्रकट होणारी आशा आणि जीवनातील नवीन आरंभ अधिक चांगले परिणाम देतात.

सूर्य देवाचे 'सप्ताश्वरूप' त्याच्या शाश्वततेचे आणि अत्यंत शक्तिशाली तत्त्वाचे प्रतीक आहेत. प्रत्येक रूप आपल्या जीवनातील एक विशिष्ट उद्देश साधण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. सूर्य देवतेच्या या रूपांची पूजा आणि त्यांचा विवेकपूर्ण विचार आपल्याला शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक दृष्टिकोनातून समृद्ध करतो. तसेच हे रूपे आपल्या जीवनातील विविध अडचणींवर विजय प्राप्त करण्याचा मार्ग दर्शवितात. सूर्याच्या सप्ताश्वरूपांमध्ये दिव्यता आहे आणि त्याची पूजा हृदयातील शांती व आत्मज्ञानाची प्राप्ती करण्यासाठी अत्यंत लाभकारी आहे.

# भारतात सर्वांत प्रथम 'या' गावावर पडतात पहिली सूर्यकिरणे!

## पहाटे ३ वाजता डोंगरावर सूर्य उगवतो; दुपारी ४ वाजताच पडतो अंधार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतात सर्वांत प्रथम सूर्योदय होणारे राज्य अरुणाचल प्रदेश आहे, हे आपण जाणतो. पण या राज्यात सुद्धा सूर्याची पहिली किरणे पडणारे जे गाव आहे ते अतिशय छोटे आणि फार सुंदर आहे. त्याचे नाव आहे डोंग. भारत- चीन- म्यानमार ट्राय जंक्शनवर असलेले हे पिटुकले गाव पूर्वोत्तर सीमेवरील भारताच्या हद्दीतील पहिले गाव आहे.

यापूर्वी अंदमानच्या कटचल टापूवर सूर्याची पहिली किरणे पडतात, असे मानले जात होते. मात्र, आता डोंग हे भारतावर सर्वप्रथम सूर्यकिरणे पडणारे गाव म्हणून प्रसिद्धीस आले आहे. १९९९ पासून हे गाव पर्यटकांच्या नकाशावर आले असून देश-विदेशातून अनेक पर्यटक येथे आवर्जून सूर्योदय पाहायला येतात.

### समुद्रसपाटीपासून १२४० मीटर उंचीवर

भारतातील बहुतेक भाग जेव्हा गाढ झोपेत असतो तेव्हा म्हणजे पहाटे ३ वाजता डोंगरावर सूर्यकिरणे पडतात. पहाटे ४ वाजता येथे स्वच्छ उजाडलेले असते आणि येथील लोक त्यांच्या रोजच्या कामाला लागलेले असतात. येथे १२ तासांचा दिवस असतो. आपण जेव्हा दुपारी चारच्या सुमारास चहा पाणी घेण्याच्या तयारीत असतो तेव्हा हे चिमुकले गाव रात्रीच्या गडद अंधारात झोपण्याच्या तयारीत असते. समुद्रसपाटीपासून १२४० मीटर उंचीवर असलेले हे गाव लोहित आणि सती नदीच्या संगमावर बसलेले आहे.

### गावाची लोकसंख्या फक्त ३५

अतिशय निसर्गसुंदर अशा या गावात साधारण ३५ लोक राहतात. शेती हाच येथील मुख्य व्यवसाय



आहे. येथे पर्यटकांना राहण्यासाठी अजून पुरेशा सुविधा नाहीत. पाटबंधारे विभागाने शेजारच्या वालोंग गावात पर्यटकांसाठी राहण्याची सुविधा दिली आहे. वालोंग येथेच १९६२ चे भारत-चीन युद्ध झाले होते. या ठिकाणी सैन्याचा मोठा तळ आहे. डोंगचा सूर्योदय पाहण्यासाठी येथून ८ किलोमीटरचा ट्रॅक करून जावे लागते.

# मनोकामना पूर्ण करणारी भारतातील प्रसिद्ध ५ सूर्य मंदिरे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**भारतात अनेक प्राचीन मंदिरे आहे. प्रत्येक मंदिर विशेष असून देवतांना समर्पित आहे. तसेच भारतात सूर्य मंदिरे देखील आहे. व हे सर्व मंदिरे सूर्य देवाला समर्पित आहे. अशी मान्यता आहे, की शुद्ध मनाने आणि भक्तीभावाने सूर्य देवांची पूजा केल्यास प्रत्येक मनोकामना पूर्ण होते. तसेच तुम्ही देखील फिरायला जाऊ इच्छित असाल तर भारतातील सूर्याच्या मंदिराला नक्की भेट देऊ शकता.**



### कोणार्क सूर्य मंदिर

कोणार्क सूर्य मंदिर हे ओडिसामधील प्रसिद्ध मंदिर आहे. या मंदिराच्या इतिहासाबद्दल बोलायचे झाल्यास काही लोकांचा असा विश्वास आहे, की ते भगवान श्रीकृष्णांचे पुत्र सांब याने बांधले होते. हे भारतातील सर्वांत सुंदर आणि प्रसिद्ध मंदिरांपैकी एक आहे. हे अनोखे मंदिर रथाच्या आकारात बनविले असून या मंदिरामध्ये अनेक रहस्ये दडलेली आहे.



### गुजरात मोढेरा सूर्य मंदिर

गुजरातमधील प्रसिद्ध सूर्य मंदिर हे मंदिर सोलंकी राजा भीमदेव यांनी बांधले होते. हे मोढेरा गावात पुष्पावती नदीकाठावर वसलेले असून हे मंदिर पाहण्यासाठी अनेक पर्यटक येथे दाखल होतात.




### औरंगाबादचे सूर्य मंदिर

बिहार येथील औरंगाबाद जिल्ह्यात असलेले सूर्यदेवाचे मंदिर प्राचीन असून खूप प्रसिद्ध आहे. या मंदिराच्या इतिहासाबद्दल जाणून घेतल्यास समजते की, सूर्यदेवाचे हे मंदिर अतिशय सुंदर असून असे मानले जाते की हे मंदिर देवतांचे शिल्पकार भगवान विश्वकर्मा यांनी स्वतःच्या हातांनी बांधले होते.



### रांची सूर्य मंदिर

झारखंडमधील रांची येथे असलेल्या सूर्यदेवाच्या या मंदिराला नक्कीच भेट द्या. या मंदिराची विशेषतः म्हणजे या मंदिरात सूर्य सात घोड्यांवर स्वार होऊन येताना दिसतो. या मंदिराचे सौंदर्य अतिशय आकर्षक आहे.



### बिहारचे सूर्य मंदिर

बिहारमधील गया येथे असलेले दक्षिणार्क सूर्य मंदिर हे प्रसिद्ध धार्मिक स्थळांपैकी एक आहे. भगवान सूर्याचे आशीर्वाद घेण्यासाठी येथे मोठ्या संख्येने भक्त दाखल होत असतात. हे मंदिर या शहरातील प्रसिद्ध मंदिर आहे.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)